पुणे महानगरपालिका

*** स्थायी समिती ***

**कार्यपत्रिका क्रमांक ३०**

स्थायी समितीची साप्ताहिक सभा **मंगळवार दि. २७/१०/२०२०** रोजी सकाळी ११:०० (अकरा) वाजता **स्थायी समिती सभागृह, दुसरा मजला, पुणे महानगरपालिकेची नवीन विस्तारीत इमारत येथे दृक श्राव्य (व्हिडिओ कॉन्फरन्सिंग) द्वारे भरेल.**

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

**वृत्तांत कायम करणे.**

**उप आयुक्त, विभागीय कार्यालय यांचे कामकाजाचा आढावा**

**विषय क्र. ६७९**

सह महापालिका आयुक्त, परिमंडळ क्र. ४ कार्यालयाचे नियंत्रणाखालील हडपसर–मुंढवा, वानवडी–रामटेकडी व कोंढवा–येवलेवाडी क्षेत्रीय कार्यालयांकडील दि. १/९/२०२० ते दि.३०/९/२०२० कामकाजाचा मासिक अहवाल निदर्शनास आणणेबाबत मा.सह महापालिका आयुक्त, परिमंडळ क्र. ४ यांचे जा.क्र. सहमआ–४/२६५० दि.१५/१०/२०२० चे पत्र.

**विषय क्र. ६८०**

उप आयुक्त, परिमंडळ विभाग क्र. १ चे अखत्यारीत येणाऱ्या ढोले पाटील रोड/येरवडा–कळस/नगर रोड (वडगांवशेरी) क्षेत्रिय कार्यालयाकडील माहे सप्टेंबर २०२० कामकाजाचा मासिक अहवाल निदर्शनास आणणेबाबत मा. उप आयुक्त, परिमंडळ विभाग क्र. १ यांचे जा.क्र. उप–१/३३७६ दि.१९/१०/२०२० चे पत्र.

**मा.सभासदांचे प्रस्ताव**

**विषय क्र. ६८१**

मा.जयंत भावे व मा.आनंद रिठे यांचे दि.२१ /१०/२०२० चे पत्र.

अखिल भारतीय महापौर मंडळाची वार्षिक वर्गणी सन २०२०–२०२१ ची रक्कम आदा करणेसाठी र.रु.१,१००/– कमी पडणा–या तरतूदीसाठी खालीलप्रमाणे वर्गीकरणास मान्यता मिळावी.

| अर्थशिर्षक | कमी र. रू. | अधिक र. रू. |
|---|---|---|
| सन २०२०–२१ चे अंदाजपत्रक<br>१. मुख्य देखरेख वसुली वगैरे,<br>क. महानगरपालिका व स्थायी समिती,<br>१. नगरसचिव यांचे कार्यालय,<br>४३. महापौर परिषदेसाठी खर्च RE11A143 | १,१००/– | ––––– |

| सुचविलेले काम | | |
|---|---|---|
| सन २०२०-२१ चे अंदाजपत्रक<br>१. मुख्य देखरेख वसुली वगैरे,<br>क. महानगरपालिका व स्थायी समिती,<br>१. नगरसचिव यांचे कार्यालय,<br>१७. अखिल भारतीय महापौर मंडळाची वार्षिक वर्गणी<br>RE11A117 | ----- | १,१००/- |

## हिशोब तपासणी अहवाल

**विषय क्र. ६८२**

कर आकारणी व कर संकलन खात्याकडील पेठ मुंढवा अे फॉर्म क्र. १ सन २०११-१२ हॉटेल ओकवुड या आकारणी प्रकरणांची व तद्नुषंगिक कागदपत्रांची तपासणी केली असता आढळुन आलेल्या आक्षेपार्ह व दोषास्पद बाबींबाबत मा.सह महा.आयुक्त (मुख्य लेखापरिक्षक) यांनी जा.क्र. मुलेप/४२३ दि. २९/५/२०१९ ने पाठविलेला हिशोब तपासणी अहवाल क्र. १० सन २०१९-२०२० ला अनुसरून मा.अति.महा.आयुक्त(ज) यांनी जा.क्र.मआ/मुले/३७६ दि.१६/१०/२०२० ने पाठविलेला आक्षेप पुर्ततेचा संकलित तक्ता-ब.

## मागील सभेचे विषय

**विषय क्र. ६८३**

देवाची उरुळी, फुरसुंगी डेपो येथे लँडफिलच्या कामकाजासाठी भाडेतत्वावर चेन बुलडोझर मशीन पुरविणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.नॅशनल अर्थमुव्हर्स यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ४९,९८,७७५/- पेक्षा १.३०% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु. ४९,३३,७९०=९२ रकमेपर्यंत काम करुन घेणेस व त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/घनकचरा/२६० दि.२/९/२०२० चे पत्र.

(टिप : सदर विषयाचा विचार १ आठवडयाने करावा असे दि. १५/१०/२०२० च्या सभेत ठरले होते.)

**प्रभारी नगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका.**

**(टिप :- प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची कागदपत्रे (डॉकेटस) नगरसचिव यांच्या कार्यालयात वाचण्यासाठी ठेवली आहेत.)**

**सुचना - कोरोना विषाणूमुळे उद्भवलेली परिस्थिती विचारात घेवून मे.केंद्र व राज्य शासनाच्या आदेशाचे तंतोतंत पालन करावे ही विनंती. व्हिडीओ कॉन्फरन्सींगची लिंक आपणास व्हॉट्सअॅप द्वारे कळविण्यात येईल.**